MHBI080000462026

दि.चौ.अर्ज.क्र.२१/२०२६
सईबाई+७ वि. निरंक

## निशाणी क्र.१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज मुंबई रेग्युलेशन नियम १८२७ चे कलम २ अन्वये दाखल करुन अर्जदारांनी ते मयत सिताराम पि. राजाराम भालेराव यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळण्याची मागणी केली आहे. अर्जातील कथनाप्रमाणे, मयत सिताराम भालेराव याचे अर्जदार क्र.१,२ ते ४, ६ व ७ आणि अर्जदार क्र.५/१ व ५/२ हे अनुक्रमे पत्नी, पाच मुले आणि मयत मुलाची पत्नी तथा सून व मयत मुलाचा मुलगा तथा नातू म्हणून कायदेशीर वारस आहेत. दि.१९/१०/२०२५ रोजी सिताराम भालेराव हे मयत झाले. अर्जदारांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता, त्यांनी अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे.

२. अर्ज नि.क्र.०१ वरील दि.०६/०१/२०२६ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस दैनिक माजलगाव टाइम्स या वर्तमानपत्रामध्ये दि.१४/०१/२०२६ रोजी नि.क्र.१२ अन्वये आणि अर्जाची नोटीस नि.क्र.०६ अन्वये प्रस्तुत न्यायालय, तहसिल कार्यालय, माजलगाव आणि ग्रामपंचायत कार्यालय केसापूरी, ता. माजलगाव, जि. बीड यांचे नोटीस बोर्डावर दि.१५/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तथापी, प्रस्तुत प्रकरणात निर्धारीत वेळेत कोणीही हजर होऊन आक्षेप घेतला नाही.

३. अर्जातील कथना आधारे माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मयत सिताराम पि. राजाराम भालेराव यांचे कायदेशीर वारस असल्याचे, अर्जदार सिध्द करतात काय? | ....होय. |
| २. | आदेश कोणते ? | .....अर्ज मंजूर. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत** :-

४. अर्जदार क्र.२ नामे सखाराम पि. सिताराम भालेराव (अ.सा.) याने पुरावा शपथपत्र नि.क्र.०९ मध्ये जवळपास अर्ज (नि.क्र.१) मधील मजकुराप्रमाणे कथन केले. अर्जदारांतर्फे दैनिक माजलगाव टाइम्स मध्ये जाहीरनामा दिल्याबद्दलच्या वर्तमानपत्राची प्रत नि.क्र.१२ वर दाखल केली आहे. तसेच, त्यांच्यातर्फे सिताराम पि. राजाराम भालेराव याचे ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, फुलेपिंपळगाव, ता. माजलगाव, जि. बीड मार्फत निर्गमीत केलेले मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.१० वर दाखल केले आहे. त्याआधारे, सिताराम भालेराव हे दि.१९/१०/२०२५ रोजी मयत झाल्याच्या तथ्यास पुष्टी मिळते. अर्जदार क्र.१,२ ते ४, ६ व ७ आणि अर्जदार क्र.५/१ व ५/२ यांचे आधारकार्डच्या मुळ प्रती सोबत पडताळणी केलेल्या प्रती अनुक्रमे नि.क्र.११/१ ते ११/८ चे चे आणि उपरोक्त अर्जदाराच्या तोंडी पुराव्याचे एकत्रीत अवलोकन केले असता, ते मयत सिताराम पि. राजाराम भालेराव यांचे अनुक्रमे पत्नी, पाच मुले आणि मयत मुलाची पत्नी तथा सून व मयत मुलाचा मुलगा तथा नातू म्हणून वारस असल्याचे दिसुन येते.

५. अर्जदारांतर्फे सादर तोंडी पुरावा अबाधीत राहीला आहे. अर्थात, सदर पुराव्यास कोणीही अव्हानीत केले नाही. करिता, मयत सिताराम भालेराव यांचे सर्व अर्जदार वर नमूद केल्याप्रमाणे वर्ग-१ चे वारस असल्याचे सिध्द होते. परिणामी, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** :-

६. मुद्दा क्र.०१ वरील निष्कर्षाचा परिणाम म्हणुन, सर्व अर्जदारांनी ते मयत सिताराम भालेराव यांचे वर नमूद केल्याप्रमाणे वर्ग-१ चे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द केले आहे. करिता, सर्व अर्जदार मागणी नुसार वारस प्रमाणपत्र

मिळण्यास पात्र आहेत. परिणामी, मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरा दाखल, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज (नि.क्र.०१) मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या नावे मयत सिताराम पि. राजाराम भालेराव यांचे कायदेशीर वारस म्हणुन मुंबई रेग्युलेशन नियम १८२७ चे कलम ३ अन्वये वारस प्रमाणपत्र निर्गमीत करावे.

SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Digitally signed by SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Date: 2026.03.12 16:24:46 +0530

(सा. शे. बुद्रूक)
दिनांक १२.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माजलगाव.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १२.०३.२०२६ |

सही/–
दिनांक – १२.०३.२०२६ (ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव